राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP-२०२०) चा अभ्यास करण्याकरीता समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०२१/प्र.क्र.०८/कौशल्य-२**
दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ मार्च, २०२१

**संदर्भ :-** मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२०.

**प्रस्तावना :**

नवीन शैक्षणिक धोरण,२०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला नवीन स्वरूप देण्याबद्दल नमूद केले आहे. या धोरणात नमूद केल्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षण हे पुढील दशकात टप्याटप्प्याने सर्व प्रशालांमध्ये व उच्च शिक्षण संस्थांमध्ये समाविष्ट करावयाचे असून त्याकरिता कौशल्यविषयक उणीवांचे विश्लेषण व स्थानिक संधीचे मापन, याआधारे व्यावसायिक शिक्षणाची प्राधान्याची क्षेत्रे निवडण्याची गरज आहे.

एकविसाव्या शतकातील नवीन शैक्षणिक धोरण, २०२० अन्वये शैक्षणिक ढाच्यामध्ये, नियमांमध्ये, प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक सुधारणा व आमूलाग्र बदल नमूद करण्यात आले आहेत. या शतकातील शाश्वत विकास ध्येये प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उदिष्ट आहे. या शैक्षणिक धोरणातून सर्जनशील विचार (Creative thinking), चिकित्सक विचार (Critical thinking), संभाषण कला (Communication), सहकार्य (Collaboration), सहवेदना (Compassion) आणि आत्मविश्वास या कौशल्यांवर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार आहे.

या शैक्षणिक धोरणान्वये शैक्षणिक व्यवस्था व संस्था यांच्याकरीता मूलभूत तत्वे (Fundamental Principles) निश्चित करण्यात आली आहेत. भारतीय मूल्ये जोपासून अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कर्तव्ये, सांविधानिक मूल्ये तसेच देशाशी असलेले बंध तयार करणे हे या धोरणातून अपेक्षित आहे.

जागतिक ज्ञान अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने आपल्या देशाची उत्तरोत्तर वाटचाल सुरू असल्याने, युवकांच्या यानुषंगाने वाढत्या आकांक्षा पूर्ण करणे आवश्यक आहे. उदयोन्मुख आर्थिक वातावरणाशी संबंधित असलेल्या कौशल्याच्या अभिवृध्दीवर भर देऊन, हे अंशत: साध्य केले जाऊ शकते. कौशल्य व ज्ञान ही कोणत्याही देशाच्या आर्थिक वृध्दीची आणि सामाजिक विकासाची प्रेरकशक्ती आहे. उच्च स्तरावरील व उत्तम दर्जाची कौशल्ये असलेले देश हे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय रोजगार बाजारातील आव्हानांशी व संधीशी अधिक परिणामकारकपणे जुळवून घेत असतात. वेग,दर्जा (गुणवत्ता) व शाश्वता या प्रमाणात कौशल्यविषयक आव्हाने पूर्ण करणे हे राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता धोरण, २०१५ याचे प्राथमिक ध्येय आहे. हे धोरण देशातील सर्वसमावेशक वृध्दीसाठी, पुढील मार्ग आखताना, रोजगार क्षमतेमध्ये व उत्पादकतेमध्ये सुधारणा करण्यासाठी कौशल्य विकासाला जोडते. कुशल

मनुष्यबळासाठी विपुल संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने, उद्योजकतेला उत्तेजन देण्यासाठी विशिष्ट प्रयत्न करण्याचे कौशल्य धोरणामध्ये योजिलेले आहे.

राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण,२०१५ मधील तरतूदी विचारात घेऊन तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील "Re-imagining Vocational Education" च्या अनुषंगाने अभ्यास करण्याकरीता व पुढील रुपरेषा ठरविण्याकरीता समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० या धोरणातील प्र.क्र १६ "Re-imagining Vocational Education" च्या अनुषंगाने अभ्यास करण्याकरीता व पुढील रुपरेषा ठरविण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ.एस.एस.मंथा, माजी अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद. | अध्यक्ष |
| २ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई. | सदस्य |
| ३ | आयुक्त,कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,कोकण भवन,मुंबई. | सदस्य |
| ४ | डॉ.एस.जी.भिरुड, उप संचालक, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयुट, मुंबई. | सदस्य |
| ५ | श्री. रणजितसिंह डिसले,ग्लोबल टिचर अॅवार्ड विनर, जि.प.शाळा, परितेवाडी,ता.माढा, जि.सोलापूर | सदस्य |
| ६ | पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिटयुट फॉर व्होकेशनल एज्युकेशन, भोपाळ चे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ८ | संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ९ | संचालक, शालेय शिक्षण (माध्य. व उच्च माध्य.)पुणे | सदस्य |
| १० | अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,पुणे | सदस्य |
| ११ | अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ , वांद्रे,मुंबई | सदस्य |
| १२ | कौशल्य क्षेत्रातील दोन तज्ञ<br>१) डॉ.श्रीकांत पाटील,पुणे.<br>२) डॉ.आश्विनी कुमार शर्मा, कुलगुरु, सिंबायोसिस स्कील अॅन्ड प्रोफेशनल विद्यापीठ,पुणे. | सदस्य |
| १३ | सह सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

समितीच्या बैठकीकरिता विशेष तज्ञांना आमंत्रित करण्याचे अधिकार समितीचे अध्यक्ष यांना राहतील.

सदरहू समितीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मुद्यांचा ( Re-imagining Vocational Education) अभ्यास करून आपला अहवाल शासनास ३ महिन्यात सादर करावा. तसेच समिति सदस्यांना बैठकीस उपस्थित रहाण्याकरीता प्रवास भत्ता व दैनदिन भत्ता नियमानुसार अनुज्ञेय राहील. सदर प्रयोजनावर होणारा खर्च संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी त्यांना "कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली प्राप्त अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०३१६१५५९०९६८०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2021.03.18 17:28:15 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
५) मा.विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्षनेता यांचे खाजगी सचिव
६) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य
७) समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य
८) मा. मंत्री, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्विय सहायक
११) मा.अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे वरिष्ठ स्विय सहायक
१२) आयुक्त, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,कोकण भवन,मुंबई.
१३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१७) महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१८)अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,

१९) निवासी  व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,

२०) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

२१) निवडनस्ती/कौशल्य-२.